दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
dainiklokaarambh@gmail.com
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १४ सप्टेंबर २०२५ | अंक २६५ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**

१९४९ : हिंदी हि भारताची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करून हिंदी दिन साजरा केला.





# मनोज जरांगे पाटील यांचा एक घाव दोन तुकडे

## 10 टक्के आरक्षणावर केलं सर्वात मोठं विधान

## आमचे मराठ्यांचे नेते छगन भुजबळ तुझ्यासारखे नालायक आणि नासके नाहीत, जातीवाद करत नाहीत, तू जातीवाद करतो

## 32 टक्के आरक्षणातील सर्व प्रवर्ग रद्द करा, मनोज जरांगे पाटील यांची सर्वात मोठी मागणी; भुजबळांना डिवचले



राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाची चर्चा आहे. मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळण्याचा मार्ग झाला आहे. मात्र राज्य सरकारने मराठा समाजाला याआधी 10 टक्के आरक्षण दिले होते. आज याबाबतची सुनावणी कोर्टात पार पडली. यावर मनोज जरांगे पाटलांनी आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे. जरांगे पाटलांनी नेमकं काय म्हटलं आहे ते सविस्तर जाणून घेऊयात.

### 50% च्या वर गेलेले आरक्षण टिकत नाही – जरांगे पाटील

आज 10 टक्के मराठा आरक्षणाबाबत कोर्टात सुनावणी पार पडली. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, कमिशनने मराठा समाज मागास सिद्ध केलेला आहे, हे सगळ्यांनाच माहीत आहे. परंतु जे दहा टक्के आरक्षण दिले आहे, ते 50 टक्क्यांच्या वर आहे. त्यामुळे आम्ही वारंवार सांगत आहे की 50% च्या वर गेलेले आरक्षण टिकत नाही. देणारे तेच आहेत आणि घेणारे तेच आहेत, सगळे सरकारचेच लोक आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण हक्काचं आहे आणि ते मिळवलं आहे. ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी काही लोकांच्या दादागिरीमुळे मराठा नेते बोलायला तयार नाहीत असं विधान केलं होतं. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, ‘अरे त्याच्यावर बोलायचं म्हटलं की माझं डोकं सरकतं, आम्ही एकमेकाचा आदर करतो, तुला अक्कल राहिली नाही. राजकारणी मराठ्यांमध्ये आणि गरीब मराठ्यांमध्ये गैरसमज कसा पसरेल एवढेच काम तू करतो. ते आमच्या दबावामुळे बोलत नाही असा अर्थ नाही, आम्ही



### छगन भुजबळांवर सडकून टीका


काही लोकांच्या दादागिरीमुळे मराठा नेते बोलायला तयार नाहीत असं विधान छगन भुजबळ यांनी केलं होतं. यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, ‘भुजबळांवर बोलायचं म्हटलं की माझं डोकं सरकतं, आम्ही एकमेकांचा आदर करतो, तुला अक्कल राहिली नाही, राजकारणी मराठ्यांमध्ये आणि गरीब मराठ्यांमध्ये गैरसमज कसा पसरेल एवढेच काम तू करतो. ते आमच्या दबावामुळे बोलत नाही, असा अर्थ नाही. आम्ही एकमेकांचा सन्मान करतो असं म्हणत भुजबळ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला

### मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण कसं पुरेल?

पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, ‘मराठ्यांना एक आरक्षण आहे, दोन आरक्षण आहे, तीन आरक्षण आहे असं जर प्रत्येक क्षेत्रात वाटत असेल आणि त्या क्षेत्रातून सुद्धा जर असे प्रश्न विचारले जात असतील, तर हे वेदनादायी आहे. आमचा समाजच तेवढा शिल्लक आहे त्यामुळे 10% पुरत नाही. ओबीसीत असून सुद्धा संख्येने आम्ही संपूर्ण राज्यात 50 55% आहे. या समाजाला दहा टक्के आरक्षण कसं पुरेल? त्यामुळे तुम्हाला दोन-तीन प्रकारचे आरक्षण आहे असं म्हणणं नेत्यांना शोभत नाही.’ पुढे बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, ‘तुमचा एक शब्द होता अराजकता माजेल, तेव्हापासून मराठे नेते टाइट झालेले आहे. तुझे शब्द आम्ही राखीव ठेवलेले आहे. तू किती शहाणा आहेस हे आम्हाला माहित आहे.

## बंजारा आरक्षणासाठी तरुणाची आत्महत्या; हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देण्याची मागणी

बीड, ता.१३:- मराठा आरक्षणासाठी हैदराबाद गॅझेट लागू करण्यात आल्यानंतर, त्याच गॅझेटच्या आधारे बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण मिळावे, अशी मागणी जोर धरत आहे. या मागणीसाठी धाराशिव जिल्ह्यातील मुरूम गावातील पवन चव्हाण या तरुणाने सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली आहे. पवन गोपीचंद चव्हाण (वय ३२) हा तरुण मूळचा मुरूम गावातील नाईक नगर येथील रहिवासी होता. त्याने बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटप्रमाणे एसटी प्रवर्गात आरक्षण मिळावे अशी इच्छा सुसाईड नोटमध्ये व्यक्त केली आहे. शनिवारी सकाळी ११ वाजता त्याने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. पोलिसांना घटनास्थळी पोहोचल्यानंतर पवनच्या खिशात एक चिठ्ठी मिळाली. त्या चिठ्ठीमध्ये त्याने हैदराबाद गॅझेटचा उल्लेख करून बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी केली होती. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



## लक्ष्मण हाके यांनी आपल्या कुटुंबातील मुलगी माझ्या कुटुंबातील मुलांना द्यावी – अ‍ॅड. गणेश मोरे

### आता आम्ही तर ओबीसी मध्ये गेलो आहोत. मग तुमची मुलगी आमच्या कुटुंबात द्या,

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील वडगाव कळसंबर येथील सामाजिक कार्यकर्ते समाजसेवक अ‍ॅड. गणेश मोरे यांनी लक्ष्मण हाके यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल थेट लक्ष्मण हाके यांनाच आवाहन केले आहे. लक्ष्मण हाके यांनी आपल्या कुटुंबातील मुलगी आमच्या कुटुंबातील मुलांना द्यावी. माझ्या कुटुंबातील माझा भाऊ माझे पुतणे तसेच माझे नातेवाईक हे उच्चशिक्षित असून आम्ही सक्षम आहोत. वडिलोपार्जित शेकडो एकर जमीन सुद्धा आम्हाला आहे. माझा भाऊ तसेच माझा पुतण्या नोकरदार असून तो सुद्धा अविवाहित असून त्याला लक्ष्मण हाके यांनी त्यांची मुलगी अथवा बहीण द्यावी. आता लक्ष्मण हाके त्यांना गणेश मोरे यांनी आवाहन करत सोयरीकीची मागणी केली आहे. आता आम्ही तर ओबीसी मध्ये गेलो आहोत. मग तुमची मुलगी आमच्या कुटुंबात द्या, तुमची मुलगी आम्ही करण्यास तयार आहोत. आमच्या कुटुंबामध्ये नातेवाईकांमध्ये सर्व अकरा मुले अविवाहित असून सर्वच उच्चशिक्षित आहेत आणि शेकडो एकर जमीन ही वडीलोपार्जित आहे. त्यासाठी लक्ष्मण हाके यांनी आपल्या कुटुंबातील मुलगी आम्हाला द्यावी. हिंदू धर्मामध्ये आंतरजातीय विवाह परंपरा पहिल्यापासूनच महाराष्ट्रात चालू आहे. परंतु आता आपण तर ओबीसी झालो



आहोत. त्यासाठी आता नातेसंबंध करा, राजकारातील स्व. लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांना आदर्श आणि दैवत मानतो. राजकारण आणि सामाजिक चळवळीतील माझे आदर्श लोकनेते विनायकराव मेटे साहेब आणि लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब हे माझे कायम आदर्श आणि दैवत मानत आहे. म्हणून येणाऱ्या काळामध्ये रोटी - बेटी व्यवहाराचा विषय येत असेल तर आपण दिलेल्या आवाहन प्रमाणे आपल्या कुटुंबातील मुलगी ही माझ्या कुटुंबात सुन म्हणुन स्वीकार करतो. पुढील काळामध्ये आमच्या कुटुंबात तुमच्या मुलीला आम्ही मुली प्रमाणे सांभाळू असे आवाहन अ‍ॅड. गणेश मोरे यांनी केले आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १४ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## 'या' 3 घरगुती उपायांमुळे कोरड्या स्कॅल्पपासून मिळेल मुक्ती, काही दिवसांतच दिसेल फरक



बदलत्या वातावरणाचा प्रत्येकाच्या आरोग्यावर परिणाम होत असतो. त्याचबरोबर त्यांचा परिणाम केसांवर देखील होतो. कारण दमट वातावरणामुळे अनेकांना केस गळण्याच्या व डोक्यात कोंडा होण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. अशातच तुम्हाला कोंड्यामुळे डोक्यात खूप खाज येते आणि केसंही पांढरे झाले आहेत तर ते कोरड्या स्कॅल्पचे लक्षण आहे. कोरड्या स्कॅल्पमुळे केवळ खाज सुटत नाही तर केस कमकुवत होतात आणि तुटू लागतात. जर तुम्हाला या समस्येने त्रास होत असेल, तर आजच्या लेखात ३ घरगुती उपाय सांगितलेले आहे जे तुमच्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. चला जाणून घेऊयात नारळाचे तेलकेसांची वाढ चांगली व्हावी यासाठी नारळाचे तेल प्रत्येक घरामध्ये वापरले जाते. तर नारळाचे तेल केवळ केसांना पोषण देत नाही तर कोरड्या स्कॅल्पसाठी एक रामबाण उपाय देखील आहे. रात्री झोपण्यापूर्वी तुम्ही तुमच्या डोक्याला थोडे कोमट नारळाच्या तेलाने मालिश करू शकता आणि सकाळी तुमचे केस धुवू शकता. काही दिवसांत तुम्हाला फरक दिसू लागेल. कोरफड जेल कोरफडीमध्ये मॉइश्चरायझिंग आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात, जे कोरड्या आणि खाज येणाऱ्या स्कॅल्पला आराम देतात. यासाठी ताजे कोरफडीचे जेल थेट स्कॅल्पवर लावा आणि 20 मिनिटे तसेच राहू द्या आणि नंतर साध्या पाण्याने केस धुवा. आठवड्यातून दोनदा असे केल्याने तुमची स्कॅल्प लवकरच निरोगी होईल. दह्याचा हेअर मास्कदह्यामध्ये लॅक्टिक ॲसिड असते, जे स्कॅल्प स्वच्छ करण्यास आणि स्कॅल्पमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करते. यासाठी तुम्ही दह्याचा वापर करू शकता. यासाठी एका वाटीमध्ये दही घेऊन त्यात थोडे मध मिक्स करून पेस्ट बनवा. ते तुमच्या स्कॅल्पवर चांगले लावा आणि 30 मिनिटांनी केस धुवा. हा मास्क तुमच्या स्कॅल्पला हायड्रेट करेल आणि तुमचे केस मऊ करेल.या सोप्या उपायांचा अवलंब करून, तुम्ही कोणत्याही केमिकलशिवाय तुमच्या कोरड्या टाळूच्या समस्येपासून मुक्त होऊ शकता आणि तुमचे केस निरोगी बनवू शकता. ( **डिस्क्लेमर : या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्यावा.)**

# अंधारे मॅडमची बदली झाली तरी बिडचा अंधेरा कायमच.

अंधारे मॅडम गेल्या तरी अंधार संपलेला नाही असे वाटते. कारण अजून बीड मध्ये नवीन सिईवो चे कार्य दिसायला हवे होते. बीड मध्ये स्वच्छता एव्हणा दिसायला होती. नवीन सिईओ साहेबांची कामगिरी लोकांना दिसायला हवी होती.आज हि बीड मधील घाण आहे तशीच आहे. सर्वत्र कचऱ्याचे ढिगारे, तुंबल्या नाल्या,अस्वछता सर्व रस्त्यावर हे सर्व आजही आहे मग नवीन सिईओ आले तरी त्यांचे काम कोणालाच कसे थोडे फारही दिसलेच नाही.आपल्या खुर्चीची जिम्मेदारीची आहे कि संपूर्ण बीड शहराची कामे वेळेवर करावी आणि तीही प्रामाणिक पणे करावीत हे कसे कळतं नाही. का कळून पण नसमजल्या सारखे करावेत. असे असेल तर बीड शहर हि आणि उद्या हि हाच अंधार आहे. अंधारे मॅडम गेल्या तरी नंतर चा सीइओ चा पडणारा प्रकाश हि सोबत घेऊन गेल्या कि काय असेच वाटते. अनेक रस्त्यावर आजही अपघात होतात ते रस्ते, जेकाही रोड आहेत त्यातील काही रडत्यावर लाईट बंद आहेत,नळालाअंधारे मॅडम बदली झाली तरी बिडचा अंधेरा कायमच. अंधारे मॅडम गेल्या तरी अंधार संपलेला नाही असे वाटते कारण अजून बीड मध्ये प्रकाश दिसायला हवा होता कारण बीड मध्ये स्वच्छता एव्हणा दिसायला हवी होती दोन महिने नवीन सिईओ साहेबांची



कामगिरी लोकांना दिसायला हवी होती.आज हि बीड मधील घाण आहे तशीच आहे. सर्वत्र कचऱ्याचे ढिगारे, तुंबल्या नाल्या,अस्वछता सर्व हे सर्व आजही आहे मग नवीन सिईओ आले तरी त्यांचे काम कोणालाच कसे थोडे फारही दिसलेच नाही. आपली खुर्ची जिम्मेदारीची आहे. संपूर्ण कामे वेळेवर करावी आणि तीही प्रामाणिक पणे करावीत.का कळून पण नसमजल्या सारखे करावेत. असे असेल तर बीड शहर आज हि आणि उद्या हि हाच अंधार आहे. अंधारे मॅडम गेल्या तरी नंतर चा सीइओ चा पडणारा प्रकाश हि सोबत घेऊन गेल्या कि काय असेच वाटते. अनेक रस्त्यावर आजही अपघात होतात शहरात जे काही रोड आहेत. त्यातील आणखी रडत्यावर लाईट बंद आहेत,नळाला 10-15 दिवसाला पाणी येते,विजेचा खंडपुराठा या सर्व बाबी सरळ मार्गी कधी होणार . लोकांनी आंदोलन किंव्हा उपोषणे केले तरच हे मार्गी लागणार का? तुमच्या मागे लागून एखादा मरेल तरच तुमच्या डोक्यात प्रकाश पडेल का कि असे असंख्य कामाची अनेक बाबी कधी या नवीन आलेल्या सिईवो साहेबांना कळेल का? नगर पालिकेच्या अश्या अनेक गैरबाबी निरदर्शनास आणूनदिवसाची सुरवात करावी का. आम्हा निगरिकांना फक्त एवढीच अपेक्षा आहे कि एकदा नगरपालिकाच्या खुर्ची वर बसल्यावरतीआपली जबाबदारी सांभाळवी आणि लोकांच्या गरजा नीट नीटक्या पूर्ण कराव्यात. तुमचे कार्य नक्कीच बिडकरांना दिसावे सदिच्छा*

**संपर्क - रुपाली देशपांडे**
**8888955539**

# पाटोद्यात करोडो रुपयांची पंचायत समिती इमारत 'उद्घाटना' अभावी धुळ खात पडून – अधिकाऱ्याची निष्क्रियता चव्हाट्यावर!

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील जनतेच्या सुविधांसाठी शासनाकडून मंजूर करण्यात आलेला कोट्यवधी रुपयांचा निधी वापरून आधुनिक सोयीसुविधांनी युक्त अशी पाटोदा पंचायत समितीची शासकीय इमारत आणि कर्मचाऱ्यांची निवासस्थाने उभारण्यात आली. मात्र, या भव्य इमारतींचा वापर सुरू न होता ती आजही बंद दरवाज्यांत धुळ खात पडली आहेत. यामागे जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी, स्थानिक प्रशासनाची बेफिकिरी व निष्क्रियता उघड झाली आहे. गेल्या काही वर्षांपूर्वीच या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून, लाखो-करोडो रुपये खर्च करून साकारलेले हे शासकीय प्रकल्प आज वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. अधिकाऱ्यांनी केवळ औपचारिक उदघाटनाची प्रक्रिया न केल्याने संपूर्ण इमारत बंद ठेवण्यात आली आहे. जनतेसाठी उभारलेली इमारत नागरिकांच्या उपयोगात न येणे म्हणजे शासनाच्या पैशांचा उघड उघड अपव्ययच असल्याची नाराजी जनतेतून व्यक्त होत आहे.सध्याच्या पंचायत समिती कार्यालयात कर्मचारी व अधिकारी यांना अत्यंत गैरसोयीच्या,अवस्थेतील इमारतीत काम करावे लागते. विजेच्या समस्या, जागेची कमतरता, पावसाळ्यात गळक्या छपराचे प्रश्न असे एक ना



अनेक प्रश्न जुन्या इमारतीत रोज निर्माण होत आहेत. याउलट कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून बांधलेली नवीन इमारत अधिकारी वर्गाच्या निष्क्रियतेमुळे वापराविना पडून आहे. सामाजिक कार्यकर्त्यांचा जाहीर सवाल आहे की जिल्हा परिषदेचे सीईओ साहेब, स्थानिक अधिकारी आणि लोकप्रतिनिधी एवढ्या मोठ्या प्रकल्पाकडे कानाडोळा करून कोणता विकास साधत आहेत? पाटोद्याच्या जनतेचे प्रश्न सोडविण्याऐवजी निधी धुळ खात पडू देणे, हा दुरदृष्टीचा भाग आहे का बेफिकिरीचा?याबाबत प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. परिणामी, नागरिकांत प्रचंड संताप निर्माण झाला आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी याविषयी गंभीर भूमिका घेत तातडीने इमारत सुरू न केल्यास मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.शासनाने कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेल्या इमारती वाया जाणे थांबवायचे असेल, तर जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी यांनी तातडीने जबाबदारी स्वीकारून इमारत जनतेसाठी खुली करावी. अन्यथा या निष्क्रियते विरोधात नागरिक रस्त्यावर उतरतील असा इशारा सामाजिक कार्यकर्ते यांनी दिला आहे.

# माहिती अधिकार महासंघाचे १४ सप्टेंबर रोजी सोलापूर येथे अधिवेशन

## सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र भावे यांच्या हस्ते उद्घाटन ; मोठ्या संख्येने सहभागी व्हावे :– डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१२) माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (फेडरेशन) ही म हाराष्ट्रातील ही जागरूक नागरीकांची व माहिती अधिकार कार्यकर्त्यांची सर्वात मोठी संघटना असुन महासंघाचे राज्यव्यापी अधिवेशन दि.१४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजतापासुन ते सायंकाळी ४ पर्यंत शिव छत्रपती रंगभवन ,शांतीसागर महाराज चौक ,सोलापुर येथे आयोजित केले आहे.या अधिवेशनासाठी राज्याच्या ३५ जिल्ह्यातुन सुमारे पाचशेच्या वर कार्यकर्ते उपस्थित राहतील असा विश्वास माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी व्यक्त केला आहे. या अधिवेशनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकारी कार्यकर्ता महासंघ चे डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.या अधिवेशनाचे उद्घाटन नाशिक येथील सुप्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते आणि निर्भय महाराष्ट्र पार्टीचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भावे यांच्या हस्ते १४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता होणार असुन कार्यकर्त्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. हे अधिवेशन यशस्वी व्हावे यासाठी माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशनच्या सोलापूर टीमने जोरदार तयारी सुरू केली आहे.शासन व प्रशासन भ्रष्टाचार मुक्त व पारदर्शक असावे व त्यात नागरीकांचा सहभाग असावा या उदात्त हेतूने अनेक समाज सेवकांच्या अविरत संघर्षानंतर माहिती आधिकार अधिनियम हा कायदा अस्तित्वात आला आहे. मात्र गेल्या काही वर्षांत हा कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी शासन व प्रशासन स्तरावर खुपच उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. नागरीकांना हक्क व अधिकार देणारा हा कायदा शासनाला नकोच आहे. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

परंतु हा कायदा प्रभावीपणे राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरीकांनी यात सहभागी होणे व या कायद्याचा सामान्य नागरिकांपर्यंत प्रचार व प्रसार होणे ही काळाची गरज असुन जागरूक व प्रामाणिक नागरीकांचा मोठा दबावगट निर्माण झाला तरच माहिती आधिकार कायदा वाचणार आहे. हा कायदा वाचावा त्याचा तळागाळापर्यंत प्रचार व प्रसार व्हावा यासाठी माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशनचे अविरत प्रयत्न चालुच आहेत असे नमुद करत या अधिवेशनामध्ये सोलापूर शहर व जिल्ह्यातील जागरूक नागरिकांनी व माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात सामिल व्हावे असे आवाहन माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी केले आहे.

# कलाकार-रसिकांची 'रेंज' जुळली; अनिलदादांनी बीड रंगभूमीवर उभारला ऐतिहासिक नाट्य सोहळा!

## रेंज पाहिजे नाट्य प्रयोगासाठी बीडकरांची तौबा गर्दी; रसिक प्रेक्षकांच्या डोळ्यात तरवळले आनंदाश्रू!

बीड, प्रतिनिधी - अनिल दादा जगताप फाउंडेशन आणि शिवसेना प्रस्तुत ङ्गरेंज पाहिजेफ या नाटकाच्या माध्यमातून अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीड रंगभूमीवर नाट्यदिप प्रज्वलीत झाला असून कलाकार आणि रसिक प्रेक्षकांमध्ये नवचैतन्य संचारले. काल रोजी बीडच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे भरगच्च रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत शहरातील सत्तर कलाकारांचा सहभाग असलेले सोनल नहार लिखित आणि लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत रेंज पाहिजे या नाटकाचा पाहिला प्रयोग सादर झाला. बीड हा कलाकारांचाच बालेकिल्ला आहे. फक्त कुणीतरी पुढाकार घेण्याची आवश्यकता होती आणि हा पुढाकार चला, बीडच्या नाट्यपरंपरेला सुवर्णयुगाकडे नेऊ या म्हणत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी घेतल्याने बीडमध्ये खंडित पडलेल्या



नाट्य परंपरेला पुन्हा नव्याने जोरदार प्रारंभ झाला असून संपूर्ण शहराच्या सांस्कृतिक चेतनेला नवजीवन लाभले आहे. सोनल नहार यांच्या समर्थ लेखणीतील संवाद, लक्ष्मीकांत दोडके यांच्या दिग्दर्शनातील ठाशीव छाप आणि तब्बल सत्तर कलाकारांचा एकत्रित सहभाग या त्रिवेणीने बीडच्या रंगभूमीवर एक अद्भुत असा सोहळा घडवून आणला.दोन महिन्यांच्या



कष्टसाध्य तालमीमधून घडवलेली ही कलाकृती प्रेक्षकांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेली. नाटकातील प्रत्येक पात्राने स्वतःची छाप सोडली. काहींनी हसवले, काहींनी रडवले, काहींनी विचार करायला लावले पण अखेरीस सर्वांनी अंतर्मनाला भिडणारा ठसा उमटविला. रसिकांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या नाटकाचे खरे यश ठरले. नाटकाचे



सहाय्यक दिग्दर्शक रोहित पुराणिक आणि निर्मिती सूत्रधार प्रतीक कांबळे यांनी या कलाकृतीला भक्कम पाया दिला. संगीत, प्रकाशयोजना आणि कलाकारांच्या प्रामाणिक मेहनतीमुळे हे नाटक केवळ प्रयोग न राहता रसिकांच्या मनाचा सोहळा ठरले. एकंदरित ङ्गरेंज पाहिजेङ्ख हे नाटक बीडच्या रंगभूमीच्या नव्या पर्वाची जोरदार सुरूवात ठरले आहे. रेंज पाहिजे या नाट्यप्रयोगाचे उदघाटन जेष्ठ कलावंत भरत अण्णा लोळगे, दै. पार्श्वभूमीचे संपादक गंमतभाऊ भंडारी, दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोषजी मानूरकर, जेष्ठ रंगकर्मी डॉ उज्वला वनवे, शिक्षक प्रेरक वैद्य सर, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक आणि हेवन व्हेज रेस्टोरंटचे संचालक तनय शेळके यांनी रंगमंचाचे विधिवत पूजन करून केले व कलाकारांना शुभेच्छा दिल्या.

-----

### कलाकारांची स्वप्ने रंगवण्यासाठी शिवसेना कायम सज्ज- अनिलदादा जगताप

शिवसेनेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महाकरंडक या स्पर्धेपासून बीडमध्ये खऱ्या अर्थाने कलाकारांना घडण्यासाठी पोषक असे सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले आहे. आज या ठिकाणी मला आत्यानंद होतो आहे की, या चंपावती महोत्सवात तयार झालेले कलाकारच बीडमध्ये खंड पडलेल्या नाट्यपरंपरेला संजीवनी देण्याचे काम करत आहेत अशा परिस्थितीत आमच्या सारख्या बाळासाहेबांच्या शिवसैनिकांनी त्यांच्या पाठीशी उभा राहणे गरजेचे आहे. कलाकारांनी स्वतःचे स्वप्न साकारण्याकरिता मेहनत करावी, पुढे येत राहावे आपल्या बीडचे नाव राज्याच्या आणि देशाच्या रंगभूमीवर गाजवावे, शिवसेना खंबीरपणे कलाकारांच्या पाठीशी सदैव उभी आहे, अशी प्रांजळ भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी नाटकाच्या उदघाटना प्रसंगी व्यक्त केली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार १४ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## अवघ्या काही मिनिटात तुटलेली हाडे जोडली जाणार...



चिनी शास्त्रज्ञांनी एक वैद्यकीय क्षेत्रात एक महत्वाचा शोध लावला आहे. चिनी शास्त्रज्ञांनी जगातील पहिला 'बोन ग्लू' तयार केला आहे. हा ग्लू केवळ 2-3 मिनिटांत तुटलेली हाडे जोडतो. तसेच हा ग्लू 6 महिन्यांत शरीरात विरघळते. याचे शरीराला कोणतेही नुकसान होत नाही. त्यामुळे आता शरीरातील हाड जोडण्यासाठी महागडे रॉड वापरण्याची गरज नाही. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

बोन ग्लू म्हणजे काय?

चिनी शास्त्रज्ञांनी 'बोन 02' नावाचे एक बायोमटेरियल विकसित केले आहे, हे हाडे चिकटवण्यासाठी वापरले जाते. हा बोन ग्लू ऑयस्टरपासून प्रेरणा घेऊन बनवलेला आहे. हा ग्लू हाड मोडलेल्या ठिकाणी इंजेक्शनद्वारे लावल्यास तुटलेली हाडे 2-3 मिनिटांत जोडली जातात. या आधी मोडलेले हाड जोडण्यासाठी धातूचे रॉड वापरले जायचे. काही काळानंतर हाड जोडल्यानंतर रॉड काढण्यासाठी दुसरी शस्त्रक्रिया करावी लागायची. मात्र आता हा ग्लू हाड बरे झाल्यावर 6 महिन्यांनी स्वतःहून विरघळतो, त्यामुळे दुसरी शस्त्रक्रिया करण्याची गरज नाही.

बोल ग्लू कसा काम करतो?

बोन ग्लू हा एक चिकट पदार्थ आहे. हा ग्लू रक्त असलेल्या भागातही घट्ट चिकटतो. शास्त्रज्ञांनी 50 हून जास्त वेळा याची चाचणी केली असून शेकडो प्रयोगदेखील केले आहे. हा ग्लू शरीरासाठी सुरक्षित आहे. तो हाडांना बरे होण्यास मदत करतो आणि नंतर विरघळतो.

Chinese researchers on Tuesday unveiled their self-developed world's first "bone glue" material capable of securely bonding fractured bone fragments within 2-3 minutes in a blood-rich environment. Inspired by oysters, this new biomaterial, with a maximum adhesion strength of over... pic.twitter.com/7ozvRrQBP0

— China Science (@ChinaScience) September 10, 2025

चीनमधील वेन्झोऊ येथील डॉ. लिन आणि त्यांच्या टीमने हा ग्लू विकसित केला आहे. आतापर्यंत 150 हून अधिक रुग्णांवर त्याची चाचणी घेण्यात आली आहे असून याचे निकाल चांगले आहेत. या ग्लू मुळे तुटलेली हाडे, फ्रॅक्चर आणि ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियांमध्ये क्रांती होणार आहे. यामुळे शस्त्रक्रियेचा वेळ आणि खर्च कमी होणार आहे. दरवर्षी जगभरातील लाखो लोकांची हाडे तुटतात. यावरील उपचार महागडे आणि वेदनादायक आहेत. धातूचे रॉड लावल्यास लावल्याने संसर्गाचा धोका किंवा दुसरी शस्त्रक्रिया करण्याचा खर्च वाढतो. मात्र बोन ग्लू या समस्येवर उपाय आहे. हा ग्लू पूर्णपणे बायोडिग्रेडेबल आहे, म्हणजेच ते शरीरात विरघळते. चीनने त्यासाठी चिनी आणि आंतरराष्ट्रीय पेटंट (PCT) साठी अर्ज केला

# हक्कासाठी जरूर लढा, पण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नका–पंकजाताई मुंडे

मुंबई । प्रतिनिधी समाज कोणताही असो,प्रश्न कितीही अवघड असो, ना उमेद होवून चालणार नाही.कोणतेही प्रश्न आत्महत्येने सुटत नाहीत. त्यामुळे कोणीही कच खाऊ नये. समोरच्या परिस्थितीशी तोंड देण्याची, संघर्षाची तयारी आपली असली पाहिजे. हक्कासाठी जरूर लढा, पण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल कोणीही उचलू नका असे कळकळीचे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सर्वच समाजातील तरूणांना केले आहे. रेणापूर जि. लातूर तालुक्यातील वांगदरीच्या भरत कराड या युवकाने ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना काल घडली. या घटनेने ना. पंकजाताई मुंडे व्यथित झाल्या. या घटनेवर बोलतांना त्यांनी मन विषण्ण झाल्याचे सांगितले, त्या म्हणाल्या, या घटनेने सर्वांचाच जीव कालवला. अशाप्रकारे नैराश्यात जाऊन आपले जीवन संपविणे योग्य नाही. जीवनात आत्महत्या केल्याने सर्व प्रश्न सुटत नसतात. यासाठी संघर्षाची तयारी प्रत्येकाने ठेवली पाहिजे.



अशा प्रकारच्या आत्महत्येच्या घटना मन पिळवटून टाकतात. आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या कुटुंबाचा, आपल्या स्वतःचा, लेकरा -बाळांचा निश्चित विचार प्रत्येकाने केला पाहिजे अशी एक नेता म्हणून नाही तर आईच्या ह्रदयातून आपली ही भावना असल्याचे पंकजाताई मुंडे यांनी म्हटले आहे. सामाजिक लढाया लढल्या जातील, कुणी जिंकेल, हरेल, त्यात कुणी राजकारण करेल, कुणी फायदा घेईल, कुणी गैरफायदा घेईल, कुणी समर्पित होऊन काम करेल पण हया सर्वामध्ये स्वतःचे मन स्वतःच्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे. कुणासमोर कधी झुकायचे नाही, लोकनेते मुंडे साहेब संघर्षाला धैर्याने सामोरे गेले,

## लोकशाही पत्रकार संघाची लोकरत्न पुरस्कार आयोजन बैठक संपन्न

रामेश्वर तांगडे प्रतिनिधी जालना

आज दिनांक १२ सप्टेंबर २०२५ शुक्रवार रोजी घनसावंगी शासकीय विश्रामगृहात लोकरत्न पुरस्कार च्या संदर्भात एक आढावा बैठक घेण्यात आली आहे. त्यानिमित्य लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष आदरणीय भागवतराव वैद्य साहेब यांनी उपस्थित जालना जिल्ह्यातील पदाधिकारी यांना लोकरत्न पुरस्काराच्या संदर्भात योग्य असे म ार्गदर्शन केले आहे. हा कार्यक्रम ७ नोव्हेंबर महिन्यात होईल. तसेच प्रदेश उपाध्यक्ष अनिश भाई यांनीही उपस्थित पदाधिकाऱ्यांना मी तुमच्या सोबत सदैव राहील आणि जिथे मला बोलवतात तिथे मी मदतीसाठी येईल असे पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिले आहे.

या आढावा बैठकीनिमित्त विशेष म्हणजे लोकशाही पत्रकार संघाचे जालना जिल्हा कार्य अध्यक्ष रामेश्वर तांगडे यांनी खूप परिश्रम घेतले या कार्यक्रमानिमित्त मराठवाडा अध्यक्ष कुरेशी साहेब, जिल्हाध्यक्ष आनंदे नाना, उपतालुका अध्यक्ष बाबासाहेब , तालुका प्रसिद्धीप्रमुख लहू धाईत, यांची प्रमुख उपस्थिती होती. ही आढावा बैठक अगदी उत्साहात आणि आनंदात संपन्न झाली.



## लोकसेवेचा दीपस्तंभ; हृदयात घर करणारा तहसीलदार ! चंद्रकांत शेळके

कधी कधी प्रशासनाची खुर्ची ही फक्त सत्तेचा आसन नसते, तर ती लोकांच्या स्वप्नांचा आणि आशांचा अखंड आधारस्तंभ बनते. पण जेव्हा त्या खुर्चीवर बसणारा माणूस स्वतःला 'महान' समजण्याऐवजी लोकांच्या सुख-दु:खात आत्मियतेने सामील होतो, तेव्हा प्रशासनाची खरी चमक उमटते. अशीच एक चमकदार ओळख आहे बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची! त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने हा लेख लिहिताना मनात एकच प्रश्न उभा राहतो – हा माणूस इतका अप्रतिम कसा असू शकतो? एकीकडे कठोर प्रशासकीय जबाबदाऱ्यांचा डोंगर, दुसरीकडे लोकांच्या हृदयात सोन्यासारखं स्थान मिळवणारा साधेपणा! शेळके साहेबांच्या आयुष्यातील हे दोन पैलू इतके विलक्षण एकरूप आहेत की, तुम्हाला आश्चर्य वाटेल – हे खरंच शक्य आहे का? आणि हो, ते खरंच खरं आहे! ही कथा फक्त चंद्रकांत शेळके यांची नाही, तर प्रत्येक सामान्य माणसाच्या संघर्षाची आणि विजयाची गाथा आहे! चंद्रकांत शेळके हे फक्त तहसीलदार नाहीत, तर लोकसेवेचा धगधगता दीपस्तंभ आहेत. त्यांच्यासाठी तहसीलदार पद हे कधीच गर्वाचं लेबल नाही, तर ते आहे जबाबदारीचा अखंड वसा, सेवेचा पवित्र संकल्प! कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला – मग तो लहानसा शेतकरी असो किंवा मोठा नेता – ते आदराचा मान देतात, त्यांचं म्हणणं मनापासून ऐकतात आणि सुस्पष्ट उपाय सुचवतात. ही त्यांची जादुई खासियत आहे, जी त्यांना एका साध्या माणसापासून असामान्य व्यक्तिमत्त्व बनवते. महात्मा गांधींच्या शब्दांत, "सेवा हीच खरी भक्ती आहे." शेळके साहेबांच्या प्रत्येक कृतीत ही भक्तीची ताकद दिसते – ते सेवा करतात, देवाप्रमाणे! बीड, गेवराई, घनसावंगी यासारख्या दुर्गम भागांत शेळके साहेबांनी आपल्या कर्तृत्वाने अमिट ठसा उमटवला आहे. गेवराई तालुक्यातील त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांना आपलंसं करत गावोगाव फिरून प्रत्यक्ष भेटी घेतल्या. एकदा तर, जुनेद बागवान आणि लोकमत प्रतिनिधी सखाराम शिंदे यांनी औरंगाबादेतून त्यांना सहज फोन केला, आणि "तुम्ही कुठे आहात? मी आलोच!" असं सांगून शेळके साहेब क्षणार्धात तिथे हजर! त्यांनी पाहुणचाराची उब आणि आपुलकीची जादू पसरवली. ही आहे त्यांची खरी कला – मनापासून मनाशी जोडणं! प्रशासकीय, राजकीय, पत्रकार – सगळ्यांना हाताळण्याची त्यांची अनोखी शैली अशी आहे की, कोणीही त्यांच्यावर रागावू शकत नाही. नेल्सन मंडेलांचे शब्द येथे खरे ठरतात: "नेतृत्व म्हणजे लोकांना सांगणे नव्हे, तर त्यांच्यासोबत धडाडीने चालणे." शेळके साहेब अगदी तसंच चालतात – लोकांसोबत, त्यांच्या पुढे! आस्मानी संकटे किंवा नैसर्गिक आपत्ती आली की, शेळके साहेब ऑफिसमधून हाक मारत बसत नाहीत – ते थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचतात! मे २०२५ मध्ये बीडमध्ये अवकाळी पावसाने हाहाकार माजवला – घरांचे पतरे उडाले, झाडे कोसळली. त्या वेळी शेळके साहेबांनी स्वतः पायाला भिंगरी लावली आणि प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण केले. शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळावी यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. डिसेंबर २०२४ मध्येही, त्यांनी ग्रामीण भागात स्वतः जिगरबाजपणे फिरून शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि ठोस उपाययोजना केल्या. यामुळे शेतकऱ्यांमध्ये त्यांचा गौरव होतोय! "शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अधिकारी सदैव तत्पर असावे," असा त्यांचा कडक आदेश, आणि तो ते स्वतः अगदी तंतोतंत पाळतात! स्वामी विवेकानंदांचे शब्द येथे खरे ठरतात: "उठा, जागा हो आणि स्वतःचा मार्ग घडवा!" शेळके साहेबांच्या प्रत्येक कृतीत ही जिगर आणि जिद्द दिसते ऑफिसमधून कारभार हाकण्याऐवजी, शेळके साहेब प्रत्यक्ष कृतीत उतरतात. त्यांचा हसतमुख चेहरा आणि आपुलकीची बोलण्याची शैली लोकांना भुरळ घालते. बदली कुठेही झाली तरी ते लोकांशी जोडलेलं सोन्याचं नातं कधीच तोडत नाहीत. गंगाखेड, बीडला गेल्यावरही गेवराईचे लोक त्यांना फोन करतात, आणि ते लगेच उत्तर देतात! हीच आहे त्यांची खरी ताकद – स्वभावाची जादू! ते कधीही चुकीच्या भानगडीत पडत नाहीत; नेहमी सत्य आणि न्यायाच्या बाजूने खंबीरपणे उभे राहतात. त्यांचा हा स्वभाव हाच त्यांचा सुपरपॉवर आहे, ज्यामुळे ते लोकांच्या हृदयात कायमचे वसतात! शेळके साहेबांची आणखी एक चमकदार बाजू म्हणजे त्यांचं लेखन! ते वर्तमानपत्रांत सामाजिक विषयांवर ज्वलंत भाष्य करतात, प्रेरक लेख लिहितात. पर्यावरण, शेतकरी आत्महत्या, स्त्री शिक्षण – अशा विषयांवरील त्यांचे लेख लोकांना विचार करायला भाग पाडतात. "लेखन हीच खरी क्रांती आहे," असं ते म्हणतात, आणि त्यांच्या लेखांतून ती क्रांतीची ठिणगी स्पष्ट दिसते! त्यांच्या लेखनाने अनेकदा सामाजिक जागृतीचा ज्वालामुखी पेटला आहे. त्यांचे लेख वाचताना वाटतं, हा फक्त अधिकारी नाही, तर एक विचारवंत योद्धा आहे! रवींद्रनाथ टागोरांचे शब्द येथे खरे ठरतात: "साहित्य हे जीवनाचे चैतन्यशील प्रतिबिंब आहे." शेळके साहेबांच्या लेखांतून जीवनाचा तेजस्वी प्रकाश उमटतो! चंद्रकांत शेळके यांचे हे गुण फक्त शब्दांत नाहीत, तर प्रत्यक्ष कृतीत उतरलेले आहेत! गेवराई आणि घनसावंगीमध्ये त्यांनी लोकांच्या कामांना वेगवान गती दिली. शेतकऱ्यांच्या आत्महत्याग्रस्त कुटुंबांना भेटून त्यांनी आधाराचा हात पुढे केला. घाटसावळी येथील भाऊसाहेब लांडे यांच्या कुटुंबाला भेटून त्यांनी मनाचा धीर दिला. हे सगळं ऐकून वाटतं, प्रशासन असं असावं – तरच देश खऱ्या अर्थाने बदलेल! शेळके साहेबांच्या वागण्यात एकच गोष्ट स्पष्ट आहे – ते पदासाठी नाही, तर लोकांसाठी आहेत! चंद्रकांत शेळके यांचा वाढदिवस हा फक्त केक आणि उत्सवाचा दिवस नाही, तर प्रेरणेचा महोत्सव आहे! ते शिकवतात की, अधिकार हे सेवेसाठी आहे, गर्वासाठी नाही! त्यांचे गुण – प्रामाणिकपणा, साधेपणा, कृतीशीलता – प्रत्येकाला जिगरबाज बनण्याची प्रेरणा देतात. महाराष्ट्राच्या या मातीला असे सच्चे सेवक मिळाले, याचा अभिमान आहे! चंद्रकांत शेळके हे फक्त तहसीलदार नाहीत, तर एक मानवीय आदर्श आहेत! त्यांच्या वाढदिवसानिमित्त दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देताना मी एकच सूर लावतो – "शेळके साहेब, असेच चालत राहा, लोकांसोबत, लोकांसाठी!"



**लेखक जुनेद बागवान गेवराई**
**मो.9730075313**

# वैद्यकीय अधीक्षकपदी डॉ.सुरेशजी साबळे यांची निवड झाल्याबद्दल भव्य सत्कार संपन्न

## अजिंक्य वाघमारे मित्र परिवाराच्या वतीने सत्काराचे आयोजन

माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक म्हणून रायगड येथून डॉ.सुरेश अर्जुन साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आदरणीय डॉ.सुरेशजी साबळे सर यांच्या गौरवशाली नियुक्तीबद्दल अजिंक्य वाघमारे मित्र परिवाराच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते अजिंक्य वाघमारे, राज सोनवणे, लक्ष्मण काठवडे, बाळासाहेब निरडे, विनायक देशमुख, नंदकिशोर निसर्गंध, मोहन शिंदे, कृष्णा बनकर, इमरान शेख, किशोर घेणे, कृष्णा काजळे, बाळू घेणे, समीर आत्तार, आशिष धाईजे, गणेश घेणे, बालाजी घेणे, दीपक हिरवे, अमोल पाबळे, विश्वजीत अलकुंटे, मुंजाबा जमदाडे, आदित्य घेणे, विशाल घेणे, रोहित घेणे, अशोक काजळे व अजिंक्य वाघमारे मित्र परिवार उपस्थित होता.



माजलगाव येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात सध्या कार्यरत असलेले वैद्यकीय अधीक्षक डॉ.मोहन कट्टे यांची कारकीर्द वादग्रस्त राहिली असून ते नेहमी गैरहजर असल्याच्या अनेक तक्रारी जनतेतून होत्या.आता त्यांची शासकीय स्तरावर बदली झाली असून त्यांचे जागी रायगड येथून डॉ.सुरेश साबळे यांना नियुक्ती देण्यात आली आहे. डॉ.सुरेश साबळे हे यापूर्वी देखील माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी ते वैद्यकीय अधीक्षक म्हणून कार्यरत होते त्यांचा कार्यकाळ येथे उत्कृष्ट राहिलेला असून त्यांच्या काळातच या रुग्णालयात एका म हिन्यात साडेचारशे महिलांच्या सिजर शस्त्रक्रिया झाल्या होत्या, त्याचप्रम ाणे विविध राष्ट्रीय कार्यक्रम राबवून त्यांनी माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे नाव उंचावले होते.कोरोना काळात देखील त्यांनी उत्कृष्ट असे कार्य करून अनेक कोरोना रुग्णांचे जीव वाचवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यानंतर साबळे यांची बीड जिल्हा शल्य चिकित्सक म्हणून नियुक्ती झाली होती त्या काळात त्यांनी उत्कृष्ट असे कार्य करून एक वेगळी शिस्त जिल्हा रुग्णालयात लावली होती त्यामुळे आजही त्यांचे जिल्हा भरात उत्कृष्ट प्रशासक म्हणून नाव आहे. मात्र बीड येथेच असताना काही राजकीय व्यक्तींनी त्यांच्या कार्यात खोडा घालून त्यांची रायगड येथे बदली करण्यात आली होती. आता त्यांची आरोग्य विभागाचे उपसचिव दीपक केंद्रे यांनी दिनांक दहा रोजी एक आदेश काढून त्या अन्वये माजलगाव येथे डॉ.साबळे यांची नियुक्ती केली आहे, त्या बद्दल सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

रविवार १४ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# पोलंडच्या एका धमकीने पुतिन टेन्शनमध्ये; आर्टिकल 4 काय आहे? तिसरं महायुद्ध...

एकीकडे रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्ध भडकलेले असताना आता दुसरीकडे रशिया आणि पोलंड या दोन देशांत कमालीची तणावाची स्थिती निर्माण झाली आहे. रशियाचे ड्रोन पोलंडच्या हवाई क्षेत्रात आल्याने या देशाने कडक पवित्रा धारण केला आहे. त्यामुळे आता रशिया आणि पोलंड या दोन्ही देशांतील संबंध बिघडले आहेत. पोलंडने रशियाचे काही ड्रोन हाणून पाडल्याने रशियादेखील आक्रमक झाली आहे. असे असतानाच आता पोलंडने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या एका निर्णयामुळे आता जगावर तिसऱ्या महायुद्धाचे ढग गडद झाले की काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे नेमकं काय घडलं?मिळालेल्या माहितीनुसार 9 आणि 10 सप्टेंबर रोजीच्या रात्री रशियाच्या एकूण 19 ड्रोनने पोलंडच्या हवाई क्षेत्रात प्रवेश केला. या ड्रोन्सना पोलंडच्या लष्कराने हाणून पाडले. आमच्या हवाई क्षेत्रात प्रवेश केल्याने आम्ही कारवाई केली, असे पोलंडचे मत आहे. ही घटना घडल्यानंतर पोलंडने लगेच आपले हवाई क्षेत्र बंद करत नागरिकांना अलर्ट दिला. लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितल्यानुसार ड्रोनचे अवशेष जमा करण्यात आले आहेत. या सर्व घडामोडी घडत असताना आता पोलंडने नाटो संघटनेचे कलम-




4 लागू करण्याची घोषणा केली आहे. पोलंडच्या या निर्णयामुळे आता संपूर्ण जगाच्या भुवया उंचावल्या आहेत. पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांनी रशियाच्या हल्ल्याविरोधात नाटोच्या कलम-4 चा उपयोग करण्याबाबत विधान केले आहे. रशिया या हल्ल्याच्या माध्यमातून उघडपणे चिथावणी देत आहे. ही घटना अगोदरच्या घटनांपेक्षा अधिक गंभीर आहे.

## नाटोचे कलम-4 आणि कलम 5 काय आहे?

नाटो संघटनेच्या कलम चारमध्ये सल्लामसलतीबाबत माहिती तरतूद आहे. नाटो सदस्य असलेल्या देशांपैकी एखाद्या देशाला धोका आहे का? याबाबत या चौथ्या कलमाअंतर्गत चर्चा केली जाते. तसेच संभाव्य धोके आणि परिस्थिती तसेच नाटो सदस्यांकडून लढा देण्याबाबतची पद्धत यावरही चौथ्या कलमाअंतर्गत चर्चा होते. नाटो संघटनेच्या कार्यपद्धतीच्या कलम-5 मध्ये एखाद्या देशावर हल्ला झाल्यास लष्करी मदत पुरवण्याबाबत तरतूद आहे. म्हणजेच पोलंड देशाने चौथ्या कलमाचा वापर करण्याचा उल्लेक केल्यामुळे आता युद्धाचे ढग गडत होत असल्याचे मत काही तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# घरफोडी प्रकरणातील आरोपी अटक शहर पोलिसांची धडाकेबाज कामगिरी


बीड । प्रतिनिधी बीड शहर पोलिसांनी पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी करत घरफोडी व दागिने चोरी प्रकरणातील आरोपीला अटक केली आहे. घटना अशी होती की, बीड शहर मधील पिंगळे गल्लीतील रहिवासी धनराज गुरखुदे हे त्यांच्या पत्नीच्या उपचारासाठी कुटुंबासह छ.संभाजीनगर येथे गेले होते. त्या काळात घराला कुलूप लावून ते बाहेर गेले असताना, अज्ञात चोरट्याने घराची कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला व घरातील सोने-चांदीसह मौल्यवान वस्तू चोरी केल्या. ही गंभीर घटना घडल्यानंतर पोलीस ठाणे बीड शहर येथे फिर्यादी मार्फत गुन्हा दाखल झाल्यावर पोलिस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी तात्काळ तपास गतीमान करण्याच्या सूचना बीड शहर पोलिसांना दिल्या. तपासादरम्यान तांत्रीक माहिती आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयित हा स्थानिक रहिवाशी शिवा नंदलाल गुरखुदे असल्याचे उघड झाले. त्याचा शोध घेतला असता, आरोपी हा चोरीनंतर बीड शहरातून गायब झाला होता. त्याच्यावर याआधीही जबरी चोरी, मारामारी असे विविध गुन्हे दाखल असून तो सतत गुन्हेगारी करणारा व बीड पोलिसांच्या अनेक गुन्ह्यात वॉन्टेड आरोपी होता. दरम्यान, गुप्त माहितीच्या तसेच आधारे पोलिसांना कळाले की आरोपी शिवा हा नांदेड येथील गणेशोत्सव कार्यक्रमांना नियमित जात आहे. ही माहिती मिळताच बीड पोलिसांच्या पथकाने नांदेड येथे गुप्तपणे सापळा लावला त्यावेळी आरोपी हा गणेशोत्सव कार्यक्रमात आला असताना पोलिसांनी योग्य वेळी दबा धरून आरोपीला अटक करण्यात यश मिळवले.



## सौ. प्रिया सिद्धनाथ निकमयांना "भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंन्दुरत्न पुरस्कार – 2025" जाहीर

डॉ. मणिभाई देसाई मानवसेवा ट्रस्ट, क्रीडा मंत्रालय भारत सरकार, निती आयोग संलग्नित दिल्ली, ISO प्रमाणित संस्था आणि डॉ. रविंद्र भोळे आरोग्यसेवा केंद्र यांच्या वतीने, सायकासॉफ्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड पुणे कर्वेनगरच्या संस्थापिका सौ. प्रिया सिद्धनाथ निकम यांनी महिलांसाठी संगणक प्रशिक्षण, सामाजिक कार्य आणि निस्वार्थ सेवेमध्ये केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन अत्यंत मनाचा पुरस्कार हा"भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिन्दुरत्न पुरस्कार"२०२५ नुकसान जाहीर करण्यात आला.हा पुरस्कार ३१ ऑक्टोबर २०२५, पुणे येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात येणार असून त्यांच्या कार्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मराठवाडा साथीचे संपादक सतिश बियाणी यांचे निधन



बीड येथील दै. मराठवाडा साथीचे संपादक सतिशमोहनलाल बियाणी यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५७ वर्षे होते. कै. सतिश बियाणी यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे. दैनिक मराठवाडा साथीचे संपादक म्हणून सतिश बियाणी यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. परळी शहरातील अनेक पत्रकार घडवण्याचे काम त्यांच्या माध्यमातून झाले.

# गायरान धारकांच्या न्याय व हक्कासाठी रिपाइंचे महाधरणे आंदोलन: पप्पू कागदे

बीड । प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील कसत असलेल्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व गायरान धारकांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठिक ११:०० वाजता बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर गायरान धारकांचे भव्य महाधरणे आंदोलन आयोजित करण्यात आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दलित पँथरच्या माध्यमातून कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा केला. कसेल त्याची जमीन राहील त्याचे घर या प्रमाणे राज्याचे समाज कल्याण मंत्री असताना १४ एप्रिल १९९० चा शासन परिपत्रक ( जी.आर) काढून कसत असलेल्या लाखो हेक्टर गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावावर केल्या. आगामी काळातही कसत असलेल्या गायरान जमिनी नियमाकुल करण्यासाठी १९९० च्या शासन परिपत्रक (जी.आर.)नुसार गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक, शेतमजूर व उसतोड कामगार यांना प्रतिमाही ३००० रु पेन्शन (मानधन) देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उताऱ्यावर असणारे पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे.आदी प्रमुख मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी मंगळवार दि.२३ सप्टेंबर २०२५ रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर गायरान धारकांच्या न्याय व हक्कासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने महाधरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती महाधरणे आंदोलनाचे आयोजक युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# रील स्टार प्रतीक शिंदेच्या फॉच्युर्नरचा भीषण अपघात, पुणे-सोलापूर महामार्गावर घडली दुर्घटना

पुणे (इंदापूर) : सोशल मीडियावर रील्समुळे प्रसिद्ध असलेल्या प्रतीक शिंदेच्या नव्या टोयोटा फॉर्च्युनरने भरधाव वेगात ह्यु ंदाई क्र ेटाला पाठीमागून धडक दिल्याने भीषण अपघात घडला आहे. या धडकेत तिन्ही वाहनांचे लाखोंचे नुकसान झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही घटना पुणे-सोलापूर महामार्गावर गुरुवारी (११ सप्टेंबर) सायंकाळी ५ वाजता मदनवाडी (सकुंडे वस्ती) येथे घडला आहे. भिगवण पोलिसांनी फॉर्च्युनर चालक प्रतीक राम शिंदे (वय २४, रा. भादलवाडी, ता. इंदापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताने ङ्गफिल्मी स्टाईल ड्र ायव्हिंगफ्ख्र पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, स्थानिकांमध्ये संतापाची लाट आहे. निखील बाळासाहेब होले (रा. अकलूज, सोलापूर) आपली ह्युंदाई क्रेटा घेऊन महामार्गावरून प्रवास करत होते. यावेळी प्रतीक शिंदेची काळी टोयोटा फॉच्यु र्नर भरधाव वेगाने पाठीमागून आली आणि क्रेटाच्या बाजूला जोरदार धडकली. या धडकेचा जोर इतका होता की, क्रेटा पुढे असलेल्या मारुती व्हॅगन आरवर जाऊन आदळली.यामुळे तिन्ही गाड्यांचा चक्काचूर झाला. फॉच्यु र्नरचा पुढचा भाग तुटला, क्रेटाचा मागचा भाग खराब झाला, तर व्हॅगन आरच्या पुढील बाजूचे मोठे नुकसान झाले. या अपघातामुळे महामार्गावर काही वेळ वाहतूक ठप्प झाली. स्थानिकांनी आणि



पोलिसांनी तातडीने धाव घेऊन वाहने बाजूला केली. क्रेटामधील प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या, पण सर्वजण सुखरूप आहेत. प्रतीक राम शिंदे (२४) हा इंदापूरमधील सोशल मीडिया रील स्टार आहे. त्याचे रेसिंग, स्टंट आणि लक्झरी कार्सचे व्हिडिओ इन्स्टाग्रामवर लाखो फॉलोअर्सना आकर्षित करतात. त्याने महिन्याभरापूर्वीच टोयोटा फॉर्च्युनर खरेदी केली होती, ज्याचे फोटो आणि रील्स त्याने सोशल मीडियावर शेअर केले होते. प्रतीक स्वतः फॉच्यु र्नर चालवत होता. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, जास्त वेग आणि अचानक ओव्हरटेकिंगमुळे हा अपघात घडला. त्याच्या गाडीने क्रेटाला बाजूने धडक दिल्याने साखळी अपघात झाला. भिगवण पोलिसांनी फिर्यादी निखील होले यांच्या तक्रारीवरून प्रतीकविरुद्ध निष्काळजी ड्रायव्हिंगसाठी गुन्हा दाखल केला आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com